सकाळ
बुधवार, ३ फेब्रुवारी २०२१

## शिवाजी कॉलेजमध्ये राष्ट्रीय कार्यशाळा

**सातारा :** येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये नुकतीच इतिहास विभागाच्या वतीने एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात झाली. अध्यापन क्षेत्रात नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञान व पद्धतीचा वापर करण्यासाठी सर्वांना मार्गदर्शन व्हावे, या उद्देशाने इतिहास विभाग व दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कोरियन भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उद्‌घाटन जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे भाषा विभागप्रमुख प्रा. रविकेश यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर या उपस्थित होत्या. कार्यशाळेत कर्मवीर भाऊराव पाटील इंजिनिअरिंग कॉलेजचे प्रा. डॉ. दिलीप अलदार यांनी आपल्या पीपीटी व व्हिडीओच्या माध्यमातून मार्गदर्शन केले, तसेच अहल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी इतिहास अध्यापनाची नावीन्यपूर्ण माहिती दिली. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. एम. एस. निकम यांनी काम पाहिले. इतिहास विभागप्रमुख डॉ. डी. बी. मासाळ यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. प्रा. अनिल कोकाटे यांनी सूत्रसंचालन केले. कोरियन भाषा विभागाचे प्रा. सत्यांशू श्रीवास्तव यांनी आभार मानले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.